चउत्थो पाढो

# ४ तिल-निमित्तेण महातक्करो

इसवी-सनाचे ११-१२ वे शतक प्राकृत (जैन महाराष्ट्री) भाषेतील कथाग्रंथांचा सुवर्णकाळ मानला जातो. वर्धमानसूरींनी अकराव्या शतकात लिहिलेला 'मणोरमा-कहा' हा ग्रंथ अनेक लहान-मोठ्या बोधप्रद कथांचा जणू खजिनाच आहे.

बालकावर संस्कार करण्यात आईच्या हातून जर कुचराई झाली तर त्याचे परिणाम मोठेपणी किती घातक होऊ शकतात - हे स्पष्ट करणारी ही कथा आहे.

तिळाच्या क्षुल्लक चोरीपासून आरंभ करून महातस्कर बनलेल्या युवकाच्या कथेतून संस्काराचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे. म्हणून बालवयात झालेले चांगले संस्कार जीवनाला आकार देतात. हे प्रत्येक आईवडीलांनी लक्षात ठेवून मुलांच्यावर चांगले संस्कार करावेत असे या कथेतून स्पष्ट केले आहे.

---

एगम्मि पट्टणे एगा गतवइया इत्थी वसइ बालवच्छा । परघरेसु पाणियं वहमाणीए मग्गाणुलग्गो गच्छइ से पुत्तो ।

अन्नम्मि दिणे नईए मज्जिऊण जलालित्तदेहो चेव जणणीए मग्गमोइण्णो सो सुओ, जण-समूह-पणोल्लिओ तिलरासीए उवरिं निवडिओ । तिलालित्त-सरीरो रोवंतो, चेव उट्ठिऊण लग्गो जणणीए पिट्ठओ । गओ नियघरं । पक्खोडिऊण सरीरगं गहिया माऊए तिला । जाया तिलमुट्ठी गुलेण काऊण कक्करियं दिण्णं दारगस्स । सो हरिसिओ नच्चिउं लग्गो । तहेव पइदिणं काउमारद्धो सो दारगो । 'बालो' त्ति काऊण ण कोवि किं पि भणेइ । माया वि ण णिवारेइ । कमेण वड्ढंतो पत्तो जोव्वणं । अब्भासवसओ महातक्करो जाओ । मुसेइ ईसर-घराणि अलक्खिओ चेव । लद्धेण दविणेण विलसइ ।

अन्नम्मि दिणे धणावहार-णिमित्तं पविट्ठो एगाए गणियाए मंदिरे । तं निब्भर-पसुत्तं जाणिऊण ताए आभरणाइं गहिउं लग्गो । सा पडिबुद्धा सयण-परियणं सद्दाविउं लग्गा । निट्ठुरमणेण तेण सा गणिया वावाइया । तुरियं तरल-तार-लोयणो वासभवणाओ नीहरंतो दिट्ठो गणिया-मायाए । 'तेणो तेणो' त्ति पोक्कारियं तीए । समागया आरक्खिय-पुरिसा । पलायमाणो गहिओ तेहिं । इत्थंतरे तेहिं दिट्ठा वावाइया गणिया । दढं संजमिऊण नीओ सो नरवइसमीवे ।

राइणा भणियं - 'गाढं पहारेऊण कयंतस्स अतिहिं करेह ।' जं सामी समाइसइ' त्ति भणिऊण निग्गओ दंडवासिओ । मसि-विलित्त-गत्तो, कंधरा-आरोविय- फुट्टघडमालो, वज्जंत-डिंडिमो, डिंभ-कय-कोलाहलो, वुड्ढ-गद्दभ-आरोविओ नीओ हट्टावलीए ।

कमेण पत्तो नियघरस्स अंगणे । अवमाणं असहिऊण उच्चसरेण कहिउं लग्गो- ''जणणि! वइरिणी ! किं ण तए पढमं व कुकम्मं कुणंतो वारिओ ?'' एवमाइ विविहं विलवंतो समारोविओ सूलाए । अट्ट-रुद्द-झाणेहिं मरिऊण समुप्पणो नरए ।

जइ जणणीए बालवए एव निवारिओ होंतो ता जोव्वणे एवंपयारेण ण मारिओ होंतो ।

---

## शब्दार्थ व टीपा

**पट्टण** (नपुं.) - पत्तन, नगर.

**गतवइया** (स्त्री.) - गत-पतिका, विधवा स्त्री.

**बालवच्छा** (समास) - बालो वच्छो जीए सा । (बहुव्रीहि) लहान आहे मुलगा जिचा अशी ती.

**वहमाणीए** (क्रि.) - 'वह', व. का. धा. वि., स्त्रीलिंगी सप्तमी एकवचन, वहन करणारी, वाहणारी.

**मज्जिऊण** - स्नान करून.

**जलालित्तदेहो** (समास) - जलेण आलित्तो देहो जस्स सो । (बहुव्रीहि) पाण्याने ज्याचा देह भिजला आहे असा तो.

**मग्गमोइण्णो** (संधि)- मग्गं + ओइण्णो । (आईच्या) मागोमाग जाऊ लागलेला.

**पणोल्लिओ** (देशी) - चेंगरलेला.

**पक्खोडिऊण** - पाखडून, झटकून

**जाया तिलमुट्ठी गुलेण काऊण कक्करिययं**

**दिण्णं दारगस्स** - (अर्थ) : जमा झालेल्या मूठभर तिळाची गूळ घालून कुरकुरीत चिक्की करून मुलाला दिली.

**काउमारद्धो** (संधि) - काउं+आरद्धो । करण्यास प्रारंभ केला, करू लागला.

**अब्भासवसओ** - तीळ चोरण्याचा रोजचा सराव झाल्यामुळे.

**महातक्करो** (पु.) - महातस्कर.

**मुसेइ** - क्रि. 'मुस', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन, चोरी करत असे.

**अलक्खिओ** - कोणाच्याही नकळत.

**धणावहारो** (समास) - धणस्स अवहारो । (षष्ठी तत्पुरुष) धनाचा अपहार.

**निब्भरपसुत्तं** (समास) - निब्भरं पसुत्तं । (कर्मधारय) गाढ झोपलेल्या त्याला.

**वावाइया** (वि.) (स्त्री.) - व्यापादित केली, ठार मारली.

**तरल-ताल लोयणो** (वि.) (पुं.) - आशंकेमुळे ज्याची नजर भिरभिरत आहे असा.

**नीहरंतो** - बाहेर पडत असताना.

**गणिया-माया** - गणिकामाता, अक्का, बाई.

**तेण** (पुं.) - स्तेन, चोर.

**पोक्कारियं** - पुकारले, आरडाओरडा केला.

**आरक्खिय-पुरिसा** - रखवालदार, पहारेकरी.

**दढं संजमिऊण** - दृढपणे संयमित करून, घट्ट बांधून.

**गाढं पहारेऊण कयंतस्स अतिहिं करेह** - (अर्थ) : खूप प्रहार करून कृतांताचे अतिथी करा, बेदम चोप देऊन यमाच्या पाहुणचाराला पाठवा.

**दंडवासिओ** (पुं.) - दण्डपाशिक, शिक्षा करणारा अधिकारी.

**मसि-विलित्त-गत्तो** - सर्वांगाला काळे फासलेला.

**कंधरा-आरोविय-फुट्टघडमालो** - गळ्यात फुटक्या मडक्यांच्या माळा घातलेल्या.

**वज्जंत डिंडिमो** - ज्याच्या पुढे नगारे वाजवले जात आहेत असा.

**डिंभ-कय-कोलाहलो** - ज्याच्या आजूबाजूला मुलेबाळे दंगामस्ती करत आहे असा.

**हट्टावली** - दुकानांची रांग, बाजार.

**विलवंतो** (क्रि.) - 'विलव', व. का. धा. वि., पुंलिंगी प्रथमा एकवचन, विलाप करणारा.

**सूलाए समारोविओ** - सुळावर चढविले.

**अट्ट-रुद्द-झाण** - आर्त-रौद्र-ध्यान; दु:खी आणि हिंसक विचार करण्याची अवस्था म्हणजे आर्त-रौद्र-ध्यान होय.

**चार ध्याने** : जैन परंपरेत ध्यानाचे चार प्रकार सांगितले आहेत - ती म्हणजे आर्तध्यान, रौद्रध्यान, धर्मध्यान, शुक्लध्यान. दु:ख व क्लेशांचे चिंतन करणे म्हणजे आर्तध्यान. हिंसक विचारात मग्न राहणे म्हणजे रौद्रध्यान. धार्मिक विचारात राहणे म्हणजे धर्मध्यान. शुद्ध आत्म्याचे चिंतन करणे म्हणजे शुक्लध्यान. यांपैकी पहिली दोन अशुभ-ध्याने आहेत. नंतरची दोन शुभ-ध्याने आहेत.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) तिलचोरियाए दारगो कमेण को जाओ ?

(२) आरक्खिय-पुरिसेहिं चोरो कस्स समीवे नीओ ?

(३) अवमाणिओ चोरो जणणिं उच्चसरेण किं कहेइ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) पहिल्या दिवशी बालकाला चिक्की कशा प्रकारे मिळाली ?

(२) विधवेचा मुलगा कशामुळे महातस्कर झाला ?

(३) गणिकेच्या घरी महातस्कराने कोणते कृत्य केले ? त्याचा परिणाम काय झाला ?

(३) 'तिलनिमित्तेण महातक्करो' या कथेचे तात्पर्य सांगा.

### प्र. ३ : व्याकरण

**अ) कंसातील क्रियापदांची योग्य रूपे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) (पक्खोड) सरीरगं गहिया माऊए तिला ।

(२) लद्धेण दविणेण (विलस) दारगो ।

(३) तेहिं दिट्ठा (वावाय) गणिया ।

(४) अट्ट-रुद्द-झाणेहिं (मर) समुप्पन्नो नरए ।

**ब) संधी सोडवा.**

मग्गमोइण्णो, जलालित्तदेहो, काउमारद्धो

### विशेष अभ्यास

**या पाठातील व का. धा. वि. च्या रूपांचा संग्रह दिला आहे. त्यांचा अर्थ लिहून, संपूर्ण व्याकरण स्पष्ट करा.**

वहमाणी, रोवंतो, वद्धंतो, नीहरंतो, विलवंतो, वज्जंतं

❑ ❑ ❑